वर्ष- १२ अंक- २१ मुंबई, मंगळवार,०७ एप्रिल २०२६ ते १३ एप्रिल २०२६ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

PG|2

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

उन्हाळ्यात शिळं अन्न खाण्याचे ५ मोठे तोटे

3 → लिबियाने करून दाखवलं, ते महाराष्ट्रही करणार !

भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या वाहतूक पोलिसाला मारहाण ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियानाला नवी दिशा; आश्रय ट्रस्टच्या कार्याचा गौरव













नाशिक , नाशिक स्टार न्यूज, नाशिक व महामहीम कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक 31 मार्च 2026 रोजी नाशिक येथील श्रीकृष्ण माधव मंगल कार्यालय, पेठ रोड येथे 'महिला रत्न पुरस्कार' व 'महामहीम रत्न पुरस्कार' वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात आश्रय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट, ठाणे यांच्या उल्लेखनीय सामाजिक व आरोग्यविषयक कार्याचा विशेष गौरव करण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासून आश्रय ट्रस्ट राज्यभर 'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' हे अभियान प्रभावीपणे राबवत आहे. महाविद्यालयीन तरुण-तरुणी, तसेच पालकांच्या रक्त तपासणीद्वारे थॅलेसेमिया प्रतिबंधासाठी जनजागृती निर्माण करण्याचे कार्य ट्रस्ट सातत्याने करत असून, या उपक्रमामुळे समाजात आरोग्याबाबत जागरूकता वाढत आहे. ग्रामीण व आदिवासी भागातही मोठ्या प्रमाणावर मोफत तपासणी शिबिरे आयोजित करून हजारो नागरिकांना लाभ मिळवून दिला आहे.

या उल्लेखनीय कार्याबद्दल आश्रय ट्रस्टचे आरोग्य विभाग सचिव पितामह प्रा. प्रकाश पांगम यांना 'महामहीम रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आश्रय ट्रस्टच्या कार्याचे कौतुक करत, 'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' अभियान राज्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त केले.

तसेच नेत्ररोग तज्ञ डॉ. प्राजक्ता जठार यांना त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल 'स्टार महिला रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. संदीप बाळासाहेब भिसे यांनाही 'महामहीम रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. युवकांमध्ये सामाजिक जाणीव जागृती, रक्तदान, आरोग्य शिबिरे, आहारविषयक मार्गदर्शन आणि सुदृढ जीवनशैलीसाठी आश्रय ट्रस्टमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा यावेळी गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास श्री. रवी कुलकर्णी (ए.के. डायग्नोस्टिक) यांचीही उपस्थिती होती. ट्रस्टच्या वतीने थॅलेसेमिया जागृती विषयक पुस्तके मान्यवरांना भेट देण्यात आली.

समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला व पुरुषांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमातून आश्रय ट्रस्टच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाल्याचे व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन नाशिक स्टार न्यूजचे संचालक श्री. विलास सूर्यवंशी व महामहीम कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष श्री. विजय जगन्नाथ ठाकूर यांनी केले. यावेळी माजी महापौर सौ. रंजनाताई पोपटराव भानसी तसेच नगरसेविका सौ. दिपाली गीते यांनाही थॅलेसेमिया जागृती पुस्तकाची प्रत भेट देण्यात आली.

घरातून उचलून नेत अत्याचार केला आणि पीडित महिलेला गावच्या चावडीवर बांधलं

यूपी, बिहार नाही तर महाराष्ट्रात घडलेय भयानक घटना

मुंबई। बीडमध्ये राज्याला हादरवून टाकणारी घटना घडली आहे. घरातून उचलून नेत महिलेवर अत्याचार करण्यात आला आहे. अत्याचार करून महिलेला चावडीवर बांधलं. बीडच्या घटनेनं महाराष्ट्राची मान शरमेनं खाली गेली आहे. या घटनेमुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.

बीड तालुक्यातील एका गावामध्ये धक्कादायक प्रकार समोर आला आहे. घरात झोपलेल्या विवाहितेला उचलून गावाबाहेर नेत तिच्यावर अत्याचार करण्यात आला. यानंतर तिला गावामध्ये आणून गावच्या चावडीवर खांबाला बांधून ठेवले गेले हा प्रकार सकाळी समोर आल्यानंतर गावकऱ्यांनी या विवाहितेची सुटका केली. या प्रकरणात पिंपळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी वैभव पटेकर याला अटक केली आहे.

आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने 17 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान या प्रकरणात पिंपळनेर पोलिसांसह पिंक पथकाकडून तपास केला जातोय. परंतु या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



पत्नीवर होत असलेल्या अत्याचाराची तक्रार दाखल करायला गेलेल्या पतीला मारहाण

एका 22 वर्षीय विवाहितेवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी तक्रार देण्यासाठी गेलेल्या पीडितेच्या पतीला सहायक उपनिरीक्षकाने कानशिलात मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मारहाणीनंतर पीडितेचा पती ठाण्यातच बेशुद्ध पडल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. शनिवारी पीडिता आणि तिचे पती पुंडलिकनगर ठाण्यात तक्रार देण्यास गेले. तेथे राठोड नामक कर्मचाऱ्याला पीडिता आपबिती सांगत असताना पोलिस आणि पीडितेच्या पतीमध्ये शाब्दिक चकमक उडाली. आरोपानुसार, हिंगे नामक पोलिसाने पीडितेच्या पतीच्या कानशिलात लगावली. जोराचा फटका बसल्याने तो जमिनीवर कोसळला. त्यानंतर पोलिसांच्या वाहनातूनच त्याला तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले. या घटनेचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. तर पोलीसांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहे. तर, पीडिताने पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही तपासणीची मागणी केली आहे.

बोगस डॉक्टरांविरुद्ध गुन्हे शाखेची मोठी कारवाई; गोवंडीत दोन तोतया अटकेत

मुंबई : मुंबईच्या शिवाजी नगर-गोवंडी परिसरात लोकांच्या आरोग्याशी खेळ मांडणाऱ्या दोन बोगस डॉक्टरांना गुन्हे शाखेने रंगेहाथ पकडून अटक केली आहे. हे दोन्ही आरोपी कोणत्याही वैद्यकीय पदवीशिवाय किंवा अधिकृत प्रशिक्षणाशिवाय दवाखाने चालवत होते आणि गंभीर आजारांवर उपचार करण्याच्या बहाण्याने रुग्णांकडून मोठी रक्कम उकळत होते. या परिसरात बेकायदेशीर दवाखाने सुरू असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेच्या 'युनिट-६'ला काही काळापासून मिळत होती. या माहितीची खातरजमा केल्यानंतर, पोलिसांनी मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) 'एम-वॉर्ड पूर्व' (देवनार) येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने एक संयुक्त मोहीम हाती घेतली. या पथकाने शिवाजी नगर परिसरातील



दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेल्या दवाखान्यांवर अचानक छापे टाकले. छाप्यादरम्यान, राजीव कपिलदेव रंजन (34) आणि कुबेरनाथ गोमती यादव (56) हे रुग्णांची तपासणी करताना आणि औषधे देताना आढळून आले. जेव्हा त्यांना त्यांच्या वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित परवाने आणि कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात आले, तेव्हा ते कोणतीही वैध प्रमाणपत्रे सादर करू शकले नाहीत. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, या दोघांपैकी कोणाकडेही वैद्यकीय क्षेत्रातील कोणत्याही शाखेची पदवी नव्हती, तसेच त्यांची 'महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल'कडे नोंदणीही झालेली नव्हती.

असे असूनही, ते स्वतःला डॉक्टर भासवून लोकांवर उपचार करत होते आणि त्याद्वारे आपल्या रुग्णांचा जीव धोक्यात घालत होते. या कारवाईदरम्यान, पोलिसांनी दवाखान्यांमधून मोठ्या प्रमाणात इंजेक्शन्स, सिरिंज, प्रतिजैविक औषधे (अँटीबायोटिक्स) आणि इतर वैद्यकीय साहित्य जप्त केले आहे. तसेच या दोन्ही आरोपींविरुद्ध शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर आता फसवणूक करणारे दवाखाने किती काळापासून सुरू होते, याचा तपास गुन्हे शाखा करत आहे.

सासू, सून आणि 'तो' असं काही समोर आलं की...

मुंबई। जर वासनेने माणसाच्या मनावर नियंत्रण मिळवले तर माणूस कोणत्या थराला जाईल सांगता येत नाही. या वासनेमुळे माणसाला नातीगोती, आपुलकी असं काहीच दिसत नाही. एका सुनेने देखील वासनेच्या आहारी जाऊन आपल्या सासूची हत्या केली आहे. सासूने आपल्या सुनेला शेजाऱ्यासोबत आक्षेपार्ह अवस्थेत बघितले. यामुळे आपले अनैतिक संबंध बाहेर येण्याच्या भीतीने सुनेनं आपल्या सासूचा प्रियकराच्या मदतीने शेवट केला. उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यातील ही घटना आहे. मात्र या हत्येचा उलगडा कसा झाली याची कहाणी थरारक आहे. ही कहाणी नेमकी काय आहे, जाणून घेऊया.

हॉर्ट ॲटॅकमुळे मृत्यू झाल्याचा बनाव

हा गुन्हा केल्यानंतर सुनेने अतिशय चलाखीने घरच्यांना माहिती दिली की, सासूचा मृत्यू हार्ट ॲटॅकमुळे झाला आहे. घरात पुरुष मंडळी नसल्याने आणि सुनेच्या बोलण्यावर विश्वास ठेवून नातेवाईकांनी अनवरी बेगम यांचा मृतदेह घाईघाईने स्मशानभूमीत दफन केला. मात्र, काही दिवसांनंतर पती अन्वर घरी परतल्यावर त्यांना शेजाऱ्यांकडून काही संशयास्पद गोष्टी समजल्या. पत्नीचा मृत्यू नैसर्गिक नसून तिची हत्या झाली असावी, असा संशय अन्वर यांना आला. त्यांनी तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेऊन न्यायाची मागणी केली आणि मृतदेहाच्या पोस्ट मार्टमची मागणी केली.



सासूने सुनेला आक्षेपार्ह अवस्थेत बघितले

मिळालेल्या माहितीनुसार, हिना असं सुनेचं नाव आहे. मृत सासू अन्वरी बेगम यांचा मुलगा अमीर आणि पती अन्वर हे कामाच्या निमित्ताने घराबाहेर राहत असत. 2 मार्च रोजी रात्री उशिरा हिनाचा शेजारी राहणारा प्रियकर आदिल तिला भेटण्यासाठी घरी आला होता. याच दरम्यान सासू अनवरी बेगम यांनी त्या दोघांना आक्षेपार्ह अवस्थेत रंगेहात पकडले. आपण पकडले गेलो आहोत आणि आता समाजात बदनामी होईल, या भीतीने हिना आणि आदिलने संतापून अनवरी बेगम यांच्या तोंडावर उशी ठेवून त्यांचा श्वास गुदमरवून खून केला.

प्रेयसीला भेटण्यासाठी बनावट भारतीय पासपोर्ट... बांगलादेशी व्यक्तीला मुंबई विमानतळावर अटक

मुंबई। मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी बनावट भारतीय पासपोर्ट वापरून थायलंडला जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका बांगलादेशी व्यक्तीला अटक केली. संशयित, 38 वर्षीय मार्डी लिटन, याने भारतात आपली ओळख लपवण्यासाठी आपले नाव बदलून लिटन दास असे ठेवले होते. तो बँकॉकमध्ये काम करणाऱ्या आपल्या बांगलादेशी प्रेयसीला भेटण्यासाठी जात होता परंतु विमानात चढण्यापूर्वीच त्याला विमानतळावर अटक करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना 11 मार्च रोजी सकाळी 8 वाजता घडली. लिटन गोव्याहून मुंबईत आला होता आणि बँकॉकला जाण्यासाठी विमानतळावर होता. जेव्हा तो इमिग्रेशन काउंटरवर आला आणि त्याने त्याचा भारतीय पासपोर्ट सादर केला तेव्हा अधिकाऱ्यांना त्याच्या पासपोर्टवर ''DRILS STATUSI' असा इशारा दिसला. यावरून असे दिसून येते की पासपोर्ट रद्द करण्यात आला आहे, जप्त करण्यात आला आहे, हरवला आहे किंवा चोरीला जाऊ शकतो. हा इशारा पाहून, कर्तव्यावर असलेले सहाय्यक इमिग्रेशन अधिकारी स्वामीनाथ दाते यांना संशय आला. त्याला लक्षात आले की पासपोर्ट पश्चिम बंगालमधील एका सीमावर्ती भागातून जारी करण्यात आला होता. संशयास्पद वाटल्याने लिटनला बाजूला नेण्यात आले आणि चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान, लिटनला आता सत्य लपवता आले नाही आणि त्याने आपला गुन्हा कबूल केला. त्याने 2018 मध्ये बांगलादेशातून बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश केल्याचे त्याने उघड केले. त्यानंतर तो पश्चिम बंगालच्या शांतीपूर भागात स्थायिक झाला, जिथे त्याने त्याचे नाव बदलून लिटन दास असे ठेवले. लिटनने पोलिसांना सांगितले की 2022 मध्ये त्याने एका स्थानिक एजंटला अंदाजे 50,000 रुपये दिले होते. एजंटने बनावट भारतीय कागदपत्रे मिळवली आणि त्याच्यासाठी भारतीय पासपोर्ट मिळवला. पासपोर्ट मिळाल्यानंतर तो गोव्याला गेला, जिथे त्याने एका हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करण्यास सुरुवात केली. पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की जेव्हा लिटन बँकॉकला जाण्यासाठी मुंबई विमानतळावर आला तेव्हा तपासणी दरम्यान त्याचा पासपोर्ट सिस्टममध्ये आधीच अवैध ठरला होता आणि त्याला प्रवास बंदी इशारा देण्यात आला होता. परिणामी, इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्याला ताबडतोब ताब्यात घेतले. इमिग्रेशन अधिकारी स्वामीनाथ दाते यांच्या तक्रारीवरून, सहार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे आणि लिटनला अटक केली आहे. बनावट कागदपत्रे मिळवून त्याचा भारतीय पासपोर्ट मिळवणाऱ्या एजंटचा पोलिस आता शोध घेत आहेत.

औषध घेताना घ्या काळजी!

■ जर तुम्ही नियमित आपल्या फॅमिली डॉक्टरकडे जात असाल आणि एखाद्या नवीन डॉक्टरकडे गेल्यास तुमची मेडिकल हिस्ट्री आणि सध्या घेत असलेल्या औषधांची माहिती त्या डॉक्टरांना अवश्य द्या. कोणत्या औषधानं ॲलर्जी होत असल्यास त्याचीही माहिती डॉक्टरांना द्या.

औषध घेण्याच्या काही विशिष्ट पद्धती असतात. जर त्या पाळल्या नाही गेल्या तर समस्या आणखी वाढू शकतात.

■ आपल्या मर्जीनं जुन्या प्रिस्क्रिप्शनवर औषधं घेऊ नये. कारण ती औषधं त्यावेळची लक्षणं आणि आजार पाहून दिलेली असतात.

■ एखादं औषध घेतल्यावर पोट खराब होणं, स्किन इन्फेक्शन अथवा सूज आल्यास तत्काळ डॉक्टारांशी संपर्क साधा.

■ औषध रिकाम्यापोटी खायचं आहे की जेवण झाल्यानंतर खायचंय याची माहिती डॉक्टरांना विचारावी.

■ औषधाची एक्सपायरी डेट पाहावी. तारीख बरोबर असेल मात्र औषधाची अवस्था खराब असल्यास, सिल फोडलेलं असल्यास अथवा रंग खराब झालेला असल्यास ते औषध घेऊ नये.



आजकाल केस गळणे, तुटणे, रुक्ष होणे अशा अनेक तक्रारी ऐकायला येतात. त्यावर उपचार म्हणून विविध प्रकारचे शाम्पू, तेल, कंडिशनर वापरण्याचा सल्ला दिला जातो, मात्र तरीही खूप फायदा होतो असे दिसून येत नाही. त्यामुळे आपल्या या केस समस्येचे कारण आपण वापरत असलेला कंगवा तर नाही ना याची खात्री करून घ्यायला हवी. कारण केसांच्या या तक्रारींसाठी तुम्ही वापरात असलेले प्लास्टिक अथवा धातूचे कंगवे कारणीभूत असू शकतात. या समस्येतून सुटका करून घेण्यासाठी लाकडापासून बनवले गेलेले कंगवे खूपच उपयुक्त ठरतात.

लाकडी कंगव्याचा वापर देईल केसांना नवसंजीवनी



भारतात फार पूर्वीपासून लाकडापासून बनवलेली फणी वापरण्याची प्रथा होती. आजही ग्रामीण भागात वृद्ध आजीबाईकडे अशी फणी सापडू शकेल. मात्र काळाच्या ओघात ही प्रथा बंद पडली. आता या फण्या कदाचित जुन्या वस्तुसंग्रहालयात पाहायला मिळतील. पण बाजारात अनेक कंपन्यांनी विविध झाडांच्या लाकडापासून बनवलेले कंगवे आणले आहेत. हे कंगवे तुमच्या केसांना नवसंजीवनी देणारे ठरू शकतात. याची अनेक कारणे आहेत.

डोक्याची केसाखालची त्वचा लाकडी कंगव्याच्या वापराने दाबली जाते. याचा फायदा डोक्यावरील ॲक्युप्रेशर पॉइंटना होतो आणि त्वचेला मसाज मिळाल्याने तेथील रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसाची मुळे घट्ट बनून केसगळती कमी होते. प्लास्टिक वा धातूचा कंगवा वापरून डोक्याच्या त्वचेत जे नैसर्गिक तेल असते ते समप्रमाणात पसरत नाही परिणामी केस तुटतात मात्र लाकडी कंगव्याने हे तेल एकसारखे डोक्यावर पसरले जाते त्यामुळे केस अधिक हेल्दी आणि चमकदार बनतात. अनेकांची डोक्याची त्वचा मुळातच तेलकट असते. लाकडी कंगवा हे तेल सर्वत्र पसरवतो आणि केस कमी तेलकट दिसतात.

लाकडी कंगव्याचे दात टोकदार नसतात तर थोडे बोथट असतात. त्यामुळे हा कंगवा केसातील गुंता सहज काढतो आणि केसात घर्षण कमी झाल्याने केस तुटण्याचे प्रमाण कमी होते. केसाखालची त्वचा सेन्सिटिव्ह असेल तर धातू अथवा प्लास्टिक कंगव्याने ॲलर्जी येऊ शकते तो धोका लाकडी कंगव्यामुळे राहत नाही कारण लाकूड हे नैसर्गिक आहे.



सब्जा खाण्याचे गुणकारी फायदे

तुळस भारतीय घरांतील पूजनीय झाड आहे. अनेक घरांमध्ये तुळशीचं रोपटं लावलेलं पाहायला मिळतं. तुळस अनेक आजारांवर औषधी म्हणून काम करते. तुळशीचं बी म्हणजेच सब्जा शरीरासाठी अतिशय गुणकारी आहे. उन्हाळ्याच्या दिवसात सब्जाचं सेवन केल्याने शरीरात होत असलेला दाह कमी करण्यास मदत होते. सब्जा आपल्या शारीरिक विकासासोबतच मानसिक विकासासाठीही लाभदायक ठरतो. सब्जामध्ये कॅलरीज, प्रोटिन, कार्बोहायड्रेट, विटॅमिन ए, के, ई, बी, मॅग्नेशियम, फायबर, कॅल्शियम आणि पोटॅशियम असतं.



केसांसाठी फायदेशीर

प्रदूषणामुळे केस निर्जीव होतात. सब्जात असणारी विटॅमिन, लोह, प्रोटीन अशी पोषक द्रव्ये केसांसाठी उपयोगी ठरतात. तेलात सब्जा भिजवून लावल्याने केस चमकदार होण्यास मदत होते.

या आजारांवर गुणकारी

मानसिक समस्या म्हणजेच टेन्शन, डिप्रेशन, मायग्रेन यांसारख्या आजारांवर सब्जा फायदेशीर ठरतो. सब्जाच्या सेवनाने उत्साही वाटते. उन्हाळ्याच्या दिवसांत पोट थंड राहते. सब्जाच्या सेवन केल्याने खाल्ल्यानंतर पोटात ॲसिडिसी कमी होते. रोगप्रतिकारशक्ती वाढते. सब्जामुळे शरीरातील टॉक्सिन दूर होतात. त्यामुळे अनेक छोट्या-छोट्या समस्या कमी होतात. शरीराला पोटातील जळजळ, ॲसिडिटी कमी करण्यासही मदत होते.

त्वचा

प्रदूषणामुळे त्वचेवर मोठा परिणाम होत असतो. परंतु सब्जा त्वचेला ठीक करण्यासाठी फायदेशीर ठरतो. नारळाच्या तेलात सब्जा भिजवून त्याने त्वचेवर मसाज करा. त्यामुळे त्वचा तजेलदार होण्यास मदत होते.

वजन कमी करते

सब्जा वजन कमी करण्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. सब्जामध्ये अल्फा-लिनोलेनिक ॲसिड असतं. यामुळे शरीरातील पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. सब्जामध्ये फायबर मोठ्या प्रमाणात असतं त्यामुळे भूक नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

बद्धकोष्ठतेचा त्रास

बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास सब्जा गुणकारी ठरतो. सब्जा शरीरातील डिटॉक्सिफिकेशनच्या प्रक्रियेत मदत करते आणि पोट, पचन क्रिया सुरळीत करून आतड्यांचे कार्य चांगले ठेवते. गरम पाण्यात सब्जा भिजवून रोज रात्री दुधासोबत घेतल्याने फायदा होतो. सब्जामुळे गॅससंबंधी समस्या दूर होण्यास मदत होते.

जर आपण गरोदर असाल, तर जितकं शक्य असेल तितकं ताण-तणावापासून दूर राहा. कारण एका अभ्यासात पुढे आलंय की, गरोदर महिलेच्या ताणामुळं संबंधित हार्मोन्सचा भ्रूणाच्या विकासावर परिणाम वाईट होतो.

प्रेग्नेन्सीदरम्यान
ताण ठेवा दूर

ताणावा संबंधीच्या हार्मोन्सचा उंदरांच्या पिल्लांवर काही परिणाम होतो का? याचा शोध घेण्यासाठी गर्भवती उंदराला ग्लूकोकॉर्टिकॉइड कॉर्टिकोस्टेरॉन हॉर्मोन दिलं गेलं. त्यानंतर संशोधकांना आढळलं की, या हार्मोनमुळे त्यांची भूक खूप वाढली. मात्र त्यांचा प्लासेंटातून भ्रूणाला मिळणाऱ्या ग्लूकोजची मात्रा कमी झाली. संशोधनाचे मुख्य लेखक ओवन वाउगन म्हणाले, निष्कर्षातून ही बाब समोर आली की, आईच्या शरीरात असलेलं तणाव हार्मोन ग्लूकोकॉर्टिकॉइड भ्रूणाच्या पोषणाला नियंत्रित करतं. आईच्या शरीरात या हार्मोनची मात्रा जितकी जास्त असेल तितका परिणाम भ्रूणाच्या विकासावर होईल. गर्भाचं वजन कमी होऊ शकतं. हा अभ्यास प्रबंध 'द जर्नल ऑफ फिजिओलॉजी' या मासिकात प्रकाशित झालाय.

ब्लॉटिंगचा त्रास असल्यास हे करा...

ब्लाटिंग म्हणजे पोट फुगणे. काही वेळेस ॲसिडिटीने पण पोट फुगत असते. काही गरिष्ठ खाण्यात आल्यानेही हा त्रास होतो. पण आज आपण या लेखात मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या ब्लॉटिंगबद्दल जाणून घेऊ या. तसेच त्यावरील उपायदेखील जाणून घेऊ या. मासिकपाळीच्या काळात ॲसिडिटीमुळे पोटात दुखते पोट फुगण्याचा त्रास देखील होतो. त्यासाठीचे काही उपाय केल्यास त्या त्रासापासून आणि वेदनांपासून मुक्ती मिळते.

■ चमचमीत मसालेयुक्त पदार्थांचा वापर टाळावा यामुळे ॲसिडिटीचा त्रास होतो.

■ पचनतंत्रामध्ये बिघाड होतो, त्यासाठी आपले पचनतंत्र सुरळीत करण्यासाठी आलं आणि लिंबाच्या चहाचे सेवन करावे.

■ गवती चहा घ्यावा ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

■ पाणी तर सर्व गोष्टींवर रामबाण उपाय आहे. जास्त पाणी पिणे उत्तम स्वास्थ्य असण्याची लक्षण आहे. पाण्यामुळेच सर्व आजार नाहीसे होतात. त्यामुळे जेवढे जमेल तेवढे पाणी पिणे फायदेशीर असतं.

■ या काळात आपल्या शरीरास पौष्टिक तत्त्व पाहिजे असतात. कॅल्शियम आणि मॅग्नेशियम आहारयुक्त पदार्थांचं समावेश करणं फायदेशीर ठरतं. केळ आणि दुधात कॅल्शियम असतं. त्याचे सेवन करावे.

■ या काळात अशा वस्तू ज्या गॅस वाढवतात आणि पोट फुगवतात ते खाणे टाळावे. सकस आहार घ्यावा. ब्रोकोली, कोबी, फ्लॉवरची भाजी खाऊ नये. त्यामुळे गॅसेस पण होते आणि ॲसिडिटीचा त्रास जास्त वाढण्याची शक्यता असते.

■ आलं शरीरातील सूज कमी करण्यास फायदेशीर असतं. यामध्ये अँटी इन्फ्लेमेटरी आणि अँटी स्पॅस्मोडिकचे गुणधर्म असतात. शरीरातील वेदना दूर करण्याचे काम करतं.

■ काही वेळा काही जण ॲसिडिटी आहे म्हणून शीतपेयाचे सेवन करतात. असे केल्याने ब्लॉटिंगचा त्रास अजून वाढतो.

■ चहा जास्त घेऊ नका कारण ॲसिडिटी वाढण्यासाठी हे कारणीभूत आहे.

■ व्यायाम आणि योगा करा. पण थकवा जाणवेल असे काही करू नका.

■ पपई ही पचनतंत्र सुरळीत करण्याचे कार्य करते. यामधले असलेले पपॅन एंझाइम पचन संस्थेला सुरळीत ठेवण्याचे काम करते. पपई खाल्ल्याने ॲसिडिटी, गॅस, ब्लॉटिंगच्या त्रासापासून सुटका होते.

■ मदिरासारखे अल्कोहोल घेत असल्यास त्वरित घेणे बंद करावे. यामुळे ॲसिडिटीचा त्रास कमी होण्याऐवजी जास्त वाढतो.



वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती 'एफ' धानिव/पेल्हार
ता.वसई, जि. पालघर ४०१ २०८

ईमेल - pelharbvvcmc@gmail.com
जा. क्र. वविशम/प्रसएफ/कर.वि./५९९/२०२५-२६
दिनांक - ०१/०४/२०२६

जाहिर नोटिस

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत बिलालपाडा विभागातील मालमत्ता धारकांनी हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

अ.क्र.	विभाग	नविन मा. क्र.		ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-याचे किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
		वॉर्ड क्र.	मा. क्र.		
१	बिलालपाडा	०८	४६५७	इसलावतीदेवी मुन्ना यादव	संजय विक्रम यादव
२	बिलालपाडा	१३	२५०४/३७	शोकीलाल रामधारी गुप्ता	आशिष कुमार व सोनु शिवचरण विश्वकर्मा (विभक्त ४०० चौ. फु पैकी २०० चौ. फुट)
३	बिलालपाडा	१३	२५०४/३७	शोकीलाल रामधारी गुप्ता	आशिष कुमार व सोनु शिवचरण विश्वकर्मा (विभक्त ४०० चौ. फु पैकी २०० चौ. फुट)
४	बिलालपाडा	१०	९८५	सन्जु सुनिलकुमार शर्मा	मोहन छत्रधारी विश्वकर्मा
५	बिलालपाडा	०१	२११७	राकेश रामलखन जायसवाल	जोखुराम रामनाथ यादव
६	बिलालपाडा	१३	१९६३४/२९	मोनिस मोहम्मद अव्वल शेख	रुखसार इमरान खान
७	बिलालपाडा	१३	२०५६०/३	महफुजुर्रहमान अकबाल अली	साजिद अली मोहम्मद अली सद्दिकी
८	बिलालपाडा	०२	६३५	शाहबान अली	मालती फुलचंद गुप्ता व इतर
९	बिलालपाडा	१३	१२५११/९	उदय कुमार चौरसिया /मिना चौरसिया	सुमन अर्जुन दुबे
१०	बिलालपाडा	०६	७३	अरुण कुमार कामताप्रसाद यादव	धनदेवी कामता प्रसाद यादव
११	बिलालपाडा	१३	११४०६/२	श्रीनु वेन्कय्या थान्डु	प्रमिला राकेश यादव
१२	बिलालपाडा	०७	३७/३६	गायत्री राजेशदत्त जोशी	मायादेवी रामनाथ जायसवाल
१३	बिलालपाडा	०७	३७/२	सर्वेश जदुराई राजभर	नींतु सुरेश राजभर
१४	बिलालपाडा	१३	१०३६८	गायत्री देवी श्रीराम विश्वकर्मा	अर्जुन श्यामलाल भारती
१५	बिलालपाडा	१३	३१७७/१२/१	लक्ष्मण फुलचंद चौहान	सुजीत कुमार श्रीलालजी यादव
१६	बिलालपाडा	०१	८०३/३	मुश्ताक अहमद अब्दुल व इतर प्रभुराम कस्तुरजी टाक	हार्दिक जेठालाल सावला
१७	बिलालपाडा	०१	८०३/४	मुश्ताक अहमद अब्दुल व इतर प्रभुराम कस्तुरजी टाक	सिद्धार्थ लख्मीचंद शाह
१८	बिलालपाडा	०८	५१९२/३	हरिशंकर प्रभु नाई	विनोद मयादिन नाई
१९	बिलालपाडा	०७	३९/३७	शिवदेवी सुभाष पाठक	रामप्रवेश रुपचंद गुप्ता
२०	बिलालपाडा	०८	१६९५	मणिराम लालबहादुर गुप्ता	शशिकला लालचंद गुप्ता/राहुल लालचंद गुप्ता
२१	बिलालपाडा	१३	१६२३८	किरण रामदेव गौतम	घनश्याम संतलाल गुप्ता

(सही)
सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'एफ' धानिव/पेल्हार
वसई विरार शहर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, ०७ एप्रिल २०२६ ते १३ एप्रिल २०२६

संपादकीय

लिबियाने करून दाखवलं, ते महाराष्ट्रही करणार !



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



मानवाने अनेक अशक्य गोष्टी शक्य करून दाखवल्या आहेत. विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रतिकूलतेतून अनुकूलता निर्माण केली आहे. महाराष्ट्रातदेखील अनेक भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती पाहायला मिळते. याच नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सरकारकडून नदीजोड आणि सिंचनासारख्या प्रकल्पांवर काम केले जात आहे. महाराष्ट्रात लिबियासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जाणार आहे. कृष्णा-पंचगंगा नदीचे पाणी मराठवाड्यात नेले जाणार आहे. हे पाणी शंभर किलोमीटर बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या सहाय्याने उजनी धरणात वळविण्यात येणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात नदीजोड आणि खोरे जोड प्रकल्पांना विशेष महत्त्व दिले. भविष्यातील पाण्याची गरज बघता हे प्रकल्प नक्कीच फायदेशीर आहेत. सध्या महाराष्ट्रात अनेक जिल्हे अजूनही दुष्काळी आहेत. काही तालुके अजूनही सिंचनाच्या प्रतिक्षेत आहेत. तर काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी मैलोनमैल वणवण भटकावे लागत आहे. तर दुसरीकडे काही जिल्ह्यांना दरवर्षी पुराचा फटका बसत आहे. हजारो टीएमसी पाणी हे नद्या नाले गटारातून वाहत जाऊन समुद्राला मिळत आहे. हाच असमतोल भरून काढण्यासाठी आणि भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी सरकारने नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य दिले आहे.

नदीजोड प्रकल्प हा ऐकायला जितका सोपा वाटत असला तरी तितकाच तो आव्हानात्मक आहे. भारताच्या बाबतीत बोलायचं झालं तर नदीजोड प्रकल्पाची संकल्पना तशी नवीन नाही. भारतात ही संकल्पना पहिल्यांदा मांडली ती ब्रिटिश इंजिनिअर सर आर्थर कॉटन यांनी. सर आर्थर कॉटन यांनी 1850 च्या दशकात दक्षिण भारतातील मुख्य नद्या जसे की गोदावरी आणि कृष्णा नदी जोडण्याचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव प्रामुख्याने दुष्काळ निवारण, सिंचन आणि जलवाहतुकीद्वारे मालाची आयात-निर्यात जलद करणे यासाठी होता.

पुढे हीच संकल्पना दिवंगत माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनीही अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. देशभरातील दुष्काळ आणि अवर्षणासारख्या नैसर्गिक संकटांना तोंड देण्यासाठी 2002 मध्ये वाजपेयींनी नदीजोड प्रकल्पाची योजना आखली. या प्रकल्पावर समितीने शिक्कामोर्तबही केले, पण संसदेत मंजुरी मिळण्यापूर्वीच निसर्गप्रेमींकडून याला कडाडून विरोध झाला. त्यामुळे योजना थांबली अन् मागे पडली. अखेर 2014 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेत येताच ही योजना मंजूर झाली आणि हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला. दुष्काळाचं सावट दूर करण्यासाठी 2014 मध्ये सरकारने यावर अंमलबजावणी सुरू केली. पहिल्या टप्प्यात केन-बेतवा या दोन नद्या जोडल्या गेल्या. सध्या भारतात अनेक राज्यात या प्रकल्पावर वेगाने काम केले जात आहे.

जगात चीन, अमेरिका, रशिया आणि कॅनडा या देशांनी नदीजोड प्रकल्प यशस्वीपणे राबविला आहे. चीनचा दक्षिण-उत्तर पाणी हस्तांतरण प्रकल्प जगातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. लिबियासारख्या आखाती देशानेही या प्रकल्पावर एकेकाळी काम केले आहे. खरं तर नैसर्गिकरित्या नदी नसतानाही हा प्रकल्प लिबियाने करण्याचे धाडस केले. अर्थात हा नदीजोड प्रकल्प नव्हता तर हा 'मानवनिर्मित नदी' तयार करण्याचा प्रकल्प होता. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश लिबियाची तहान भागवणे हा होता.

लिबियाचा 99 टक्के भाग वाळवंटाने व्यापलेला आहे. उष्णता इतकी भयानक आहे की जमिनीवर पडलेल्या पाण्याचे लगेचच बाष्पीभवन होते. लिबियाच्या अनेक भागात 10-10 वर्षे पाऊस पडत नाही. कच्च्या तेलाच्या बाबतीत, लिबियामध्ये अमेरिकेपेक्षा जास्त तेलाचे साठे आहेत, परंतु गोड्या पाण्याच्या बाबतीत, येथे एकही नैसर्गिक नदी नाही. अशा भीषण पाणी टंचाई असलेल्या देशात खनिज तेलाचा शोध घेत असताना मोठा खजिना सापडतो. तो खजिना असतो पाण्याचा. 1950 मध्ये लिबियामध्ये तेलाचा शोध सुरू होता, त्याचवेळी खोदकाम करताना भूगर्भातील गोड्या पाण्याचा साठा सापडला. तहानलेल्या देशासाठी हा एकप्रकारे खजिनाच होता. त्यावेळी लिबियावर राज्य करणाया मुअम्मर गद्दाफी यांनी हे पाणी लिबियाच्या उत्तरेला वसलेल्या शहरांमध्ये घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. हे पाणी वाहून नेणे सोपे नव्हते, कारण पाणी दक्षिणेला होते आणि वाहून उत्तरेला न्यायचे होते. हे अंतर 2820 किमी इतके होते. तरी मुअम्मर गद्दाफी यांनी या खर्चिक आणि अवघड प्रकल्पाला 1980 ला हात घातला.

सुरुवातीला कृत्रिम नदीच्या माध्यमातून पाणी वाहून नेण्यावर विचार केला गेला. मात्र भयानक उष्णता असल्याने पाण्याचे बाष्पीभवन होण्याची भीती होती. त्यामुळे हा प्रकल्प बंद पाईपलाईनच्या माध्यमातून करण्याचे ठरवले. प्रकल्पासाठी इतकी आव्हानं होती की सुरुवातीला पाईप बनवण्याचे कारखाने उभे केले गेले. कारखाने उभे करतानाच रस्त्यांची देखील निर्मिती केली. काँक्रीट आणि स्टील वापरून 13 फूट व्यासाचे आणि 8 टन वजनाचे 5 लाख पाईप बनवण्यास सुरूवात झाली. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी 5 अरब डॉलर खर्च करण्यात आले. या प्रकल्पाची गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली. ही मानवाने बनवलेली पहिली नदी होती. 1889 मध्ये प्रकल्पाच्या दुर्सया टप्प्यात जबल हसुना ते लिबियाची राजधानी ट्रीपोलीला पाईपलाईनद्वारे जोडले गेले. हे अंतर सुमारे 700 किलोमीटर इतके होते. तिर्सया टप्प्यात कुफ्रा येथून पाणी बेनघाझी या शहराला वाहून नेण्यात आले हे अंतर तब्बल 1000 किमी होते. ही मानवाने तयार केलेली पहिली मानवनिर्मित नदी होती. लिबियासाठी ही नदी जीवनदायिनी होती. हा जगातला सर्वात मोठा सिंचन प्रकल्पदेखील होता. हे पाणी केवळ पिण्यासाठी नाही तर शेतीसाठी आणि कारखानदारीसाठी वापरले जाऊ लागले. या प्रकल्पासाठी 28 बिलियन डॉलर खर्च आला. विशेष म्हणजे अन्य कोणत्याही देशाची मदत न घेता लिबियाने हा प्रकल्प वेळेत अन् स्वतःच्या हिमतीवर पूर्ण केला. 2011 मध्ये लिबियामध्ये गृहयुद्ध सुरू झाले. या युद्धातच मुअम्मर गद्दाफी हे महत्त्वाकांक्षी नेते मारले गेले. त्यानंतर नाटोने केलेल्या हल्ल्यात पाईप निर्मितीचे कारखाने उडवण्यात आले. या गृहकलहात प्रकल्पाचा टप्पा 4 आणि 5 ठप्प झाला. तसेच ज्या भागांना पाईपलाईनद्वारे पाणी पुरवले गेले होते त्याभागातला पाणीपुरवठादेखील विस्कळीत झाला. खरं तर लिबियाने जे करून दाखवले ते जगानेदेखील आठवं आश्चर्य म्हणून पाहिलं. मुअम्मर गद्दाफी हे स्वतः या प्रकल्पाबाबत बोलताना हा प्रकल्प म्हणजे जगातलं आठवं आश्चर्य आहे असे सांगत.

मानवाने अनेक अशक्य गोष्टी शक्य करून दाखवल्या आहेत. विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रतिकूलतेतून अनुकूलता निर्माण केली आहे. महाराष्ट्रातदेखील अनेक भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती पाहायला मिळते. याच नैसर्गिक संकटावर मात करण्यासाठी सरकारकडून नदीजोड आणि सिंचनासारख्या प्रकल्पांवर काम केले जात आहे. महाराष्ट्रातही लिबियासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जाणार आहे. कृष्णा-पंचगंगा नदीचे पाणी मराठवाड्यात नेले जाणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा आणि पंचगंगा नद्यांना दरवर्षी पूरजन्य परिस्थिती निर्माण होते. जवळपास 40 टीएमसी पाणी हे समुद्रात वाहून जाते. हेच पाणी शंभर किलोमीटर बोगद्यातून गुरुत्वाकर्षणाच्या सहाय्याने उजनी धरणात वळविण्यात येणार आहे. उल्हास खोऱ्यातील पाणीही दुष्काळग्रस्त मराठवाड्याकडे वळवले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर अर्थसंकल्पात नदीजोड प्रकल्पांना मोठे प्राधान्य देण्यात आले आहे. यासाठी जवळपास 1 लाख 20 हजार 383 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पाणी हे पृथ्वीतलावरील प्रत्येक सजीवाचे जीवन आहे. पृथ्वीवर एकूण पाण्याच्या साठ्यापैकी साधारणपणे 2.5 टक्के पाणी हे गोडे पाणी आहे. मात्र, यातील बराचसा भाग हिमनद्या आणि बर्फाच्या रूपात साठलेला असल्याने, मानवी वापरासाठी प्रत्यक्षात 1 टक्क्यापेक्षाही कमी पाणी उपलब्ध आहे. जगातील सुमारे 2.2 अब्ज लोक अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. युनायटेड नेशन्सच्या 2025 च्या अहवालानुसार, हवामान बदलामुळे हिमनद्या वेगाने वितळत असल्याने जगातील गोड्या पाण्याचे स्त्रोत संकटात आहेत. सध्या जगातील निम्म्या लोकसंख्येला पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. संयुक्त राष्ट्रांनी 2026 च्या अहवालात 'जागतिक जल दिवाळखोरी' असा उल्लेख केला आहे. अहवालानुसार, मानवाकडून पाण्याचा वापर निसर्गाच्या पुनर्भरण क्षमतेपेक्षा कितीतरी अधिक वेगाने होत आहे. यामुळे अनेक देश पाणी दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहेत. जगभरातील 2.1 अब्ज लोकांना आजही सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत नाही. त्यामुळे येत्या काळात पाण्याचे संवर्धन करणे, वाहून जाणारे पाणी अडवणे आणि दुष्काळी भागापर्यंत हेच पाणी वाहून नेणे, अशा ठोस उपाययोजनांवर प्रत्येक राष्ट्राला काम करावे लागणार आहे. महाराष्ट्रानेही याच पाणी संवर्धनाच्या मोहिमेत आघाडी घेतली आहे. पाण्यापासून वंचित असणाऱ्या अनेक जिल्ह्यांना सुजलाम सुफलाम करण्याचा निर्धार केला आहे. त्यामुळे हा केवळ एक निर्धार नाही तर भविष्यातील अनेक पिढ्यांच्या समृद्ध जीवनाची हमी आहे, असेच म्हणावे लागेल.

विधिमंडळ विरुद्ध प्रशासन संघर्ष का पेटलाय?

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला संलग्न गॅलऱ्यांमध्ये प्रेक्षक गॅलरी, अध्यक्ष गॅलरी, वार्ताहर गॅलरी, विदेशातील शिष्टमंडळे व राजदूत आणि संसद सदस्यांसाठी गॅलरी आहेत. केवळ इतर देशातील पाहुणे गॅलरीत उपस्थित असल्यास त्यांची दखल घेतली जाते व स्वागत केले जाते. अधिकारी गॅलरी महत्त्वाची असली तरी त्याची कामकाजात अधिकृत दखल कधीच घेतली जात नसते. पण गेल्या काही वर्षांत या गॅलरीचा उल्लेख सदनात वारंवार होऊ लागला आहे. याची कारणे अनेक आहेत. मंगळवारी अर्थसंकल्पावरील चचेर्ला सुरूवात होत असताना सभागृहात चार मंत्री हजर होते. तर अधिकारी गॅलरीत काही मोजके चेहरे दिसत होते. विरोधी बाकांवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील बोलायला उभे राहत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप वळसे पाटील यांनी सभागृहातील मंत्र्यांची उपस्थिती व अधिकाऱ्यांची रिकामी दिसणारी गॅलरी यावर भाष्य केले. त्यावरून मोठा गहजब झाला. वळसे पाटील व जयंत पाटील या दोघांची विधानसभेतील ही सलग आठवी टर्म आहे. दोघेही शरद पवारांचे शिष्य आहेत. राजकारणी म्हणून पवारांविषयी अनेक मत-मतांतरे असली तरी त्यांनी संसदीय प्रथा-परंपरांचे उल्लंघन केल्याचे फारसे दाखले नाहीत. पण त्यांच्या तालमीत तयार झालेल्यांना यावर भाष्य करावे लागते, हे विशेष. शिवाय त्यावर अध्यक्ष राहुल नार्वेकर बोलते झाले. ही शेवटची संधी आहे असे त्यांनी प्रशासनाला बजावताच राज्याच्या उच्चस्तरीय अधिकारीवर्गात नक्कीच चर्चा झाली असणार. अर्थसंकल्पावरील चर्चा हा संसदीय लोकशाहीतला फार महत्त्वाचा भाग आहे. याचे कारण सरकार विधिमंडळाच्या अनुमतीशिवाय सरकारी तिजोरीतला एक रुपयाही खर्च करू शकत नाही. त्यासाठी दरवर्षी राज्याचा आर्थिक ताळेबंद सरकारकडून मांडला जातो व त्याला सभागृहाची अनुमती घेतली जाते. त्याआधी अर्थसंकल्पावर विस्तृत चर्चा आणि विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना सरकारकडून समाधानकारक उत्तर मिळणे हा राज्यातल्या जनतेचा अधिकार आहे. कारण ते त्यांच्या कष्टाच्या कमाईतला हिस्सा कररूपाने सरकारी तिजोरीत जमा करत असतात. पण अलीकडच्या काही वर्षात हा केवळ सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातला सामना बनत असल्याचे चित्र निर्माण होत आहे. अर्थसंकल्पावरील चचेर्ला सरकारमधील सर्व वरिष्ठ मंडळी उपस्थित असणे हा संकेत आणि परंपरा आहे. पण आता सभागृहात अर्थमंत्री तर सोडाच पण राज्यमंत्रीही उपस्थित नाहीत, असे वळसे-पाटील म्हणाले. स्वतः अर्थमंत्रीपद भुषविलेल्या वळसे-पाटील यांच्यावर हे बोलण्याची वेळ आली. अध्यक्षांना त्यावर कडक भूमिका घ्यावी लागली. हा विषय केवळ सरकार आणि विरोधक यांच्यापुरता मर्यादित राहत नाही. विधिमंडळाचे प्रत्येक अधिवेशन सुरू होण्यापूर्वी गेल्या काही वर्षांपासून एक शासन आदेश जारी केला जातो. त्यात शासनाकडून विधिमंडळ कामकाजाबाबत काय खबरदारी घ्यायला हवी याच्या मुद्देनिहाय सूचना असतात. अधिकाऱ्यांनी गॅलरीत उपस्थित राहण्यापासून ते मंत्र्यांना प्रत्येक विषयावर टिपण तयार करून देण्यापर्यंत सविस्तर सूचना असतात. १५-२० मुद्दयांची हे आदेश जारी करूनही अशी वेळ का येते? बरे हे आदेश संसदीय कामकाज विभागाच्या सचिवांच्या सहीने जारी होतात, हे विशेष! एकूणच विधिमंडळ कामकाजाविषयी कोणाला किती गांभीर्य आहे हा खरा मुद्दा आहे. सरकार विरोधकांना गांभीर्याने घेते का, त्यानंतर विरोधक विधिमंडळाचे कामकाज गांभीर्याने घेतात का यावर प्रशासनाचे गांभीर्य ठरू लागले आहे. पूर्वी अधिकारी गॅलरीत राज्याचे सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहत. विरोधी बाकांवरून उपस्थित केलेल्या मुद्दयांवर मुख्यमंत्री, संबंधित मंत्री यांना सभागृहातील शिपायांमार्फत चिठ्ठया पाठवून ते विभागाची भूमिका कळवत. पण अलीकडे गॅलरीतील उपस्थिती रोडावली आहे. मंगळवारी अध्यक्षांनी तंबी देताच काही वेळात वित्त विभागाचे ज्येष्ठ अधिकारी गॅलरीत दिसून आले. संसदीय लोकशाहीचे गांभीर्य जितके जपले जाईल तितके प्रशासन शिस्तीत राहील. कामकाजात जेवढी तडफ दिसेल तेवढे अधिकारी चौकस राहतील. सरकार विरोधकांची पर्वा करत नाही, असे दिसल्यानंतर अधिकारी तरी कशाला पर्वा करतील. सरकारमध्येही काही बेबनाव असेल तर अधिकारीही तसेच वागतील. हे असेच चालू द्यायचे असेल तर प्रश्नच मिटला. मागच्या आठवड्यात राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे भारतीय प्रशासन सेवेतील सदस्य सचिव देवेंद्रसिंग व सहसंचालक सतिश पडवळ यांना निलंबित करण्याचे आदेश अध्यक्षस्थानावरून देण्यात आले. सभागृहात चर्चा होत असलेल्या विषयावर ते आपल्याला माहिती देण्यासाठी उपस्थित राहिले नाहीत, असे मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या. त्यावर सरकार म्हणून सभागृहात भूमिका मांडली जाणे अपेक्षित होते. लोकनियुक्त सरकारचा प्रशासनावर वचक नाही किंवा वरिष्ठ अधिकारी मंत्र्यांना जुमानत नाहीत हे दृष्य सभागृहात दिसायला नको होते. विरोधकांकडून याचा अचूक फायदा घेतला जाणे अपेक्षित होते. पण चर्चा भलतीकडे गेली. एक आयएएस अधिकारी सभागृहात निर्लेबित होतो याची वरिष्ठ अधिकाऱ्यांत चर्चा नक्कीच झाली असणार. तरीही अधिकारी गॅलरीत फारशी उपस्थिती नसणे हे अचंबित करणारे आहेच. शिवाय आपली दिशाच कुठेतरी चुकतेय असे दाखवते. प्रशासन म्हणजेच 'कार्यपालिका' हा राज्यघटनेने स्वतंत्र स्थान बहाल केलेला स्तंभ आहे. राज्यघटना आणि लोकहित याच्याशी बांधिलकी दाखवत प्रशासनाने काम करणे अपेक्षित आहे. चूक ते चूकच आणि बरोबर ते बरोबरच असे म्हणणे अपेक्षित आहे. शिवाय संसद व न्यायपालिका या दुसऱ्या दोन स्तंभाविषयी तितकेच गांभीर्य दाखविणे अभिप्रेत आहे. या समतोल ढळल्या तर फारच पंचाईत होईल. अलीकडे कार्यपालिका सत्ताभिमुख झाली आहे. जे सत्तेवर आहेत किंवा सत्तेवर वर्चस्व गाजवून आहेत त्यांच्याप्रती बांधिलकी दाखवा व इतरांना फारसे गांभीर्याने घेण्याची गरज नाही, अशी भूमिका घेतली जात आहे. काळ बदलतो, भूमिका बदलतात. तसेच हा देश, राज्य कोणा विशिष्ट व्यक्तिसमुहाची जहागीर नाही, लोक ठरवतील तसे चित्र बदलेल हे लक्षात घेतले जात नाही. राजकारणावर ज्यांचे वर्चस्व आहे त्यांच्याप्रती संवेदनशील रहा. कधी अडचणी आल्या तर तेच आपल्याला सहीसलामत बाहेर काढतील अशी भावना बळावत चालली आहे. आपल्याला मिळत असलेले पारिश्रामिक, सोयी-सुविधा, मान-मरताब हे सर्वसामान्य जनतेच्या कष्टातून उपलब्ध झालेले आहे. ते कष्ट मुंबईसारख्या महानगरातला सामान्य नोकरदार करतो, तसाच राज्याच्या दुसऱ्या टोकाला राहणारा, जगण्यासाठी धडपड करत मिळालेल्या चार पैशातून सरकारचे कर प्रामाणिकपणे भरणारा एखादा फाटका माणूसही करतो. त्यांचा लोकशाही मुल्यांवर विश्वास असेतोवर ते निर्वैधपणे सुरू राहणार आहे. तसेच आपल्याला मिळालेले अधिकार हे अनेकांच्या बलिदानातून, त्यागातून तयार झालेल्या एका सार्वभौम प्रजासत्ताकाचे अधिकार आहेत. तेव्हा आपली बांधिलकी, संवेदना व्यापक लोकहिताची असायला हवी, याचे भान सर्वांनी बाळगणे अपेक्षित आहे. त्या व्यापक लोकसंवेदनांचे प्रतिबिंब जोवर सभागृहात उमटत राहील तोवर आपली व्यवस्था उत्तम चालेल, हे ध्यानात राहिलेले बरे!

MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhaindar (W) 401101, Tal. Dist.- Thane 28192828.

Ref.No/mbmc/Animal/283/2025-26 **Date :- 30/03/2026**

// Tender Notice //

Mira Bhaindar Municipal Corporation invites tenders from experienced contractors in the form of Online Tender, To catch stray animals/pigs/goats/sheep,, medication, to deal with them. (Period – 3 Years)

The Tender form and other relevant document will be available & submit the tender dully filled on https:\\mahatenders.gov.in from **Dt: 01/04/2026 to Dt: 08/04/2026 till at 01.00 P.M.** Tenders will be opened on **Dt: 09/04/2026 at 3.00 P.M.**

Name of the Tender	Tender form fee	Earnest money deposit	Availability of Tender form & Submission	Online Tender Opening
To catch stray animals / pigs/ goats/ sheep, medication, to deal with them. (Period – 3 Years)	Rs. 2500/- + / Rs.450/- = Rs. 2950/- (Tender Fee + 18 % GST)	50,000/-	Dt : 01/04/2026 To Dt: 08/04/2026 Upto 1.00 P.M	Dt. 09/04/2026 at 3.00 P.M.

Note :-

1. **Tender Documents shall not be sent or received via Post.**
2. **Tender Submission is online only.**
3. **EMD and Document Fees shall be submitted through online receipt system Available on e-tendering website.**

Ref. No. :- MBMC / PRO/Ad./E-8712048/2025-26
Date :- 30/03/2026

Sign
(Dr. Sachn Bangar)
Deputy Commissioner
Animal Husbandry Dept.
Mira Bhaindar Municipal Corporation

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,०७ एप्रिल २०२६ ते १३ एप्रिल २०२६

‘मला चार वर्ष बायको बनवून ठेवलं अन्...’

पोलीसासोबत चार वर्ष लिव्ह-इन मध्ये राहणाऱ्या तरुणीने आयुष्य संपवलं



गडचिरोली। पोलीस कॉन्स्टेबलने लग्नाचे आमिष दाखवून गेल्या चार वर्षांपासून शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा गंभीर आरोप करत एका तरुणीने आत्महत्या केलीये.. प्रेमाच्या नावाखाली झालेल्या या फसवणुकीमुळे खचलेल्या तरुणीने अखेर टोकाचे पाऊल उचलले. ही घटना उघडकीस आल्यानंतर पोलीस प्रशासनावर टीकेची झोड उठली असून, कायद्याचे रक्षकच जेव्हा भक्षक बनतात, तेव्हा न्यायाची अपेक्षा कोणाकडून करायची, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. उत्तर प्रदेशातील आग्र्या शहरातून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. परंतु मृत्यूला कवेत घेण्यापूर्वी तिने समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ प्रसारित केला, ज्याने संपूर्ण पोलीस दल हादरून गेले आहे. पोलीस कॉन्स्टेबलकडून चार वर्ष लैंगिक शोषण तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, मृत तरुणी आग्र्यात तैनात असलेला पोलीस कॉन्स्टेबल जेबी गौतम याच्यासोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत होती. जेबी गौतम हा ताजगंज पोलीस ठाण्यातच कार्यरत होता. पीडितेने मृत्यूपूर्वी चित्रीत केलेल्या व्हिडिओमध्ये आपल्या व्यथा मांडताना सांगितले की, आरोपीने तिला पत्नीप्रमाणे चार वर्षे सोबत ठेवले होते. जेव्हा तिने लग्नासाठी तगादा लावला, तेव्हा त्याने कुटुंबाचे कारण पुढे करून नकार देण्यास सुरुवात केली. आरोपी तिला केवळ लग्नाचे आश्वासन देऊन शारीरिक संबंधांसाठी वापरत होता आणि नंतर तिच्यापासून दुरावू लागला. व्हिडिओमध्ये ती आर्त स्वरात विचारताना दिसते की, "तो स्वतः पोलीसवाला आहे म्हणून त्याच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही का?" या एका वाक्यातून तिने व्यवस्थेबद्दल असलेला अविश्वास आणि तिला सहन करावा लागलेला मानसिक त्रास स्पष्टपणे जगासमोर मांडला आहे.

आरोपी कॉन्स्टेबलला अटक आणि कारवाई

व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आणि पीडित कुटुंबाने तक्रार दिल्यानंतर पोलीस विभागात वेगाने हालचाली झाल्या. डीसीपी सिटी अली अब्बास यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आरोपी कॉन्स्टेबल जेबी गौतम याला तात्काळ निलंबित करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास चक्रावली आणि आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले, तिथून त्याची रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे. पीडितेच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून तो नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. पोलीस आता त्या व्हिडिओला महत्त्वाचा पुरावा मानून तांत्रिक तपास करत आहेत. प्रशासनाने आश्वासन दिले आहे की, आरोपी पोलीस दलातील असला तरी त्याला कोणीही पाठीशी घालणार नाही आणि कायद्यानुसार कठोर शिक्षा केली जाईल. मात्र, या घटनेने पोलीस दलाची प्रतिमा मलिन झाली असून एका निष्पाप तरुणीला आपला जीव गमवावा लागला आहे.

भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या वाहतूक पोलिसाला मारहाण



मुंबई, मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अमर पॅलेस परिसरात दोन दुचाकीस्वारांमधील भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याला काही तरुणांनी मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली. या वेळी संतप्त तरुणांनी पोलिसांची वर्दी फाडण्याचाही प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. या हल्ल्यात पोलीस शिपाई किरण सहाणे गंभीर जखमी झाले असून, आरोपींनी चक्क पोलीस चौकीत घुसून राडा केला आणि पोलिसाची कॉलर पकडून त्याला शिवीगाळ करत मारहाण केली. काशिमिरा वाहतूक शाखेचे पोलीस शिपाई किरण सहाणे हे आपल्या सहकाऱ्यांसह अमर पॅलेस नाका येथे गुरुवारी सायंकाळी आठच्या सुमारास वाहतूक नियमनाचे काम करत होते. यावेळी रस्त्यामध्ये दोन मोटरसायकल स्वार युसुफ राईन आणि तस्लीम खान यांच्यामध्ये जोरदार भांडण सुरू झाले. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलीस तिथे गेले आणि दोन्ही गटांना समजावून सांगून वाहतूक चौकीत नेले. चौकीत युसुफ राईन याने फोन करून आपल्या साथीदारांना बोलावून घेतले. काही वेळातच ८ ते १० जण तिथे आले आणि त्यांनी चौकीत बसलेल्या दुर्सया व्यक्तीला मारहाण करण्यास सुरुवात केली.

त्यावेळी किरण सहाणे यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आरोपी युसुफ राईन याने थेट पोलिसाची कॉलर पकडून त्यांचा शर्ट फाडला. आरोपींनी शिवीगाळ करत आम्ही पोलिसांना घाबरणारे नाही, तर घाबरवणारे आहोत अशा धमक्या देत लोखंडी कड्याने आणि लाकडी दांडक्याने सहाणे यांच्या डोक्यावर, मानेवर आणि पाठीवर मारहाण केली. यावेळी ३० ते ४० लोकांचा जमाव तिथे जमला होता. ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या मारहाणीचा व्हिडिओ काढर्णाया एका व्यक्तीचा मोबाईल हिसकावून त्यातील व्हिडिओ डिलीट करण्यात आला. तसेच महिला पोलीस कर्मचारी नम्रता मिनोजी यांनाही धक्काबुक्की करण्यात आली. अखेर जमावाच्या तावडीतून सुटून जखमी अवस्थेत सहाणे यांनी पोलीस ठाणे गाठले. त्यानंतर त्यांना तातडीने भाईंदर येथील पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, त्यांच्या कानाला आणि नाकाला गंभीर दुखापत झाली आहे. काशिमिरा पोलिसांनी या प्रकरणी युसुफ इस्त्राईल राईन , सरफराज राईन, नायब राईन, अब्दुला राईन या मुख्य आरोपींसह इतर ७ ते ८ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या आरोपींवर बेकायदेशीर जमाव जमवून, सरकारी कामात अडथळा आणणे, पोलिसाला मारहाण करून जखमी करणे आणि धमकावणे या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काशीमिरा पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

वहिनीने धरला ठेका, दिरालाही आला चेव...

पण जोशमध्ये येऊन केलं भलतंच... मग काय झाली पोलिसांची एंट्री

घटनेची पुनरावृत्ती

यापूर्वीही जबलपूर जिल्ह्यात व्हायरल झालेल्या व्हिडिओत दोन तरुण डान्स करणाऱ्या महिलेसोबत हातात बंदुक घेऊन नाचताना दिसत आहेत. हा व्हिडिओ 5 आणि 6 मे रोजी मध्यरात्री झालेल्या एका लग्न समारंभाचा होता.
लग्न समारंभात बाहेरून महिला नर्तकांना बोलावण्यात आले होते. तेव्हा दोन तरुण हे स्टेजवर पोहोचल्यानंतर महिलांसोबत हातात बंदूक घेऊन नाचू लागले होते.
दोन्ही तरुणांनी नर्तक महिलांसोबत गैरवर्तन करू लागले होते. ही संपूर्ण प्रकरण मोबाइलमध्ये रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

बीड। एका लग्नात दिराने आपल्या वहिनीसोबत डान्स केला. या नाचकामाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हे सर्व पाहताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दिराला अटक केली आहे. ही घटना मध्यप्रदेशातील छतरपूर येथील आहे. एका लग्न समारंभातील दीर आपल्या वहिनीसोबत नाचत होता. वहिनीनेही त्याच्यासोबत चांगलाच ठेका धरला होता. त्याचवेळी दिराने पिस्तूल काढलं आणि ते हातात घेऊन हलवू लागला होता. दिराने केलेलं हे कृत्य कॅमेऱ्यात कैद झालं आहे. काही वेळानंतर संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. पोलिसांच्या हाती व्हिडिओ आल्यानंतर त्यांनी ताबडतोब कारवाई केली. तेव्हाच पोलिसांनी दीराच्या मुसक्या आवळल्या आहेत.



व्हिडिओ पाहिल्यानंतर कळतं की, चंद्रपाल यादव उर्फ चंदू आपल्या वहिनीसोबत एका लग्नाचा मनमुरादपणे आनंद घेत आहेत. त्यानंतरच त्या संबंधित दिराला अटक करण्यात आली आहे.

चेंबूरमध्ये एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

मुंबई। मुंबईत एक संतापजनक घटना समोर आली आहे. चेंबूरच्या टिळक नगर परिसरात एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन नराधमांना अटक केली आहे. या घटनेमुळे मुंबईतील महिला आणि मुलींच्या सुरक्षितेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आणि दोन्ही आरोपी हे गोवंडी येथील शिवाजी नगर परिसरातील रहिवासी आहेत.

कामाच्या बहाण्याने आरोपींनी या अल्पवयीन मुलीला टिळक नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोलावून घेतले होते. तिला निर्जन ठिकाणी असलेल्या झुडपात नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप पीडितेने केला आहे. मुलीच्या जबाबाच्या आधारे पोलिसांनी तातडीने आफताब आणि अनिस नावाच्या दोन संशयितांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर केले जाणार असून, त्यांना पोलीस कोठडी मिळण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.



वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. ववि‌शम /कर/४०८/२०२५-२६

दिनांक - ०२/०४/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	मालमत्ता क्र.	पावती क्र.	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कत्यार्चे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन नाव
1	VR06/2309/5	24428	अविनाश बाबु गोरीवले	मंगेश मधुकर धावडे
2	VR06/1693/26	24817	वर्षा गुंजाळ	रुत्वी रोहित पाखड/ रोहित सुरेश पाखड
3	VR06/2188/18	24429	श्री साई इंटरप्राइजेस	सत्यविजय तुकाराग घाडी
4	VR06/2316/9	23899	इरफान मोदग्गद खत्री	ज्योती दिपक वाडेकर
5	VR06/1352/35	23900	रोहन दशस्थ गोंधळेकर	सुजन तुकाराम येरम/ स्नेहल सुजन येरम
6	VR06/2129/27	23904	मनोज मारुती फागे	महादेव वसंत कांबळी
7	VR06/1086/59	23902	रमाकांत महादेव मुदूस/रेवती रमाकांत मुदूस	महेश शांताराम फटकरे मनिषा महेश फटकरे
8	VR06/1/11	11519	अनिता नयन महयावंशी	संदिप बाकू आरसेकर
9	VR06/2257/15	25267	जयप्रकाश अनंत पाटील	अंशी मदनलाल पाटील
10	VR06/1704/59	24860	संजना संजय हेगिष्टे	कोमल सचिन शेरखाने
11	VR06/1717/65	23361	मंगेश प्रभाकर पाठक	कमलेश पांडुरंग खांवे/ रशमी कमलेश खांवे
12	VR06/1062/16	24425	सुरेश सदानंद कवळी	हर्ष कृष्णा कोनार
13	VR06/20641/4	24853	नूतन राजेश ग्हात्रे	गोतेश दताराम कदम
14	VR06/2156/8	25010	बच्चेलाल फुलचंद गुप्ता	विलास आत्माराम काणेकर/विजय आत्माराम काणेकर
15	VR06/1860/110	25009	वासंती मधु सुवर्णा	विष्णु विश्राम गावडे
16	VR06/1894/99	25201	सखाराम शिवराम अडबळ	दिपक रमेश खावडकर
17	VR06/1720/80	25200	बिलर्स	कृष्णकांत तिवारी/प्रतिमा तिवारी
18	VR06/1703/28	25204	धनंजय एम. महाडीक	शीतल धनंजय महाडिक
19	VR06/1872/13	25329	संजय महादेव गोरे	दिपक भीमराव लांडगे / आशितोष भीमराव लांडगे
20	VR06/2139/24	20761	धर्मेंद्रकुमार रविंद्र दुबे	धर्मेंद्र बद्रीप्रसाद विश्वकर्मा

सही /-

सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com